# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३४२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०७/२०१८

**१) अल्पवयीन मुलीला पळवुन नेवुन जिवे मारण्याची धमकी देवुन अत्याचार केल्याने गुन्हा नोंदः –**

सन २०१६ चे घटणे दिवसा पासुन ते ०७/०६/०१८ पर्यंत यातील आरोपीने फिर्यादीला तिच्या पालकाच्या ताब्यातुन पळवुन नेवुन तिला जिवे मारण्याची धमकी देवुन तसेच स्वतः जिवाने मारण्याची धमकी देवुन फिर्यादीला फसविण्याची धमकी, भीती दाखवुन तिच्यावर वारंवार अत्याचार केला अशी फिर्यादीच्या तोडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३६३,३६६(अ),३७६(२)(एन) भादवी. सहकलम ६,८,१२ आल लैगींक अत्याचार संरक्षण अधिनीयम २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डहाके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) संगनमत करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २६/०६/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील तिन्ही आरोपींतानी संगणमत करून कोर्टाचे मनाई आदेश असतांनी सुध्दा फिर्यादीचे शेतात जावुन परे टाकले, त्यांना हटकले असता, 'तुझ्याने जे बनते ते तु कर जास्त करशील तर जुला जिवाने मारीन' अशी धमकी दिल्याने फिर्यादी राजकुमार गुलाबजा लांबट वय ३४ वर्ष रा. नेहरू वार्ड मोहाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४४७, १८८,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास नापोका. वरखडे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**३) शेतीच्या जाण्या–येण्याच्या रस्त्याच्या वादावरून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ४/०७/२०१८ चे ०८.०० वाजता यातील फिर्यादी व आरोपी यांचे शेतीबाबत मा. जे. एमएफसी कोर्ट पवनी येथे प्रकरण सुरू असुन मा. जेएमफएसी कोर्ट पवनी येथे प्रकरण सरू असुन मा. जेएमफएसी कोर्ट पवनी यांनी सदर शेतीच्या रस्त्यावरून जाण्या–येण्याकरीता आदेश पारीत केले असुन यातील फिर्यादी हा त्याचे शेतामध्ये परे टाकण्याकरीता बैलबंडी व ट्रॅक्टर घेवुन जात असतांना आरोपी याने फिर्यादीला अडवुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने व शिवीगाळ करून कोर्टाचे आदेशाचे उल्लंघन केल्याने फिर्यादी गोपीचंद अशोक हुमणे वय ६५ वर्ष रा. तिर्री यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३४१,१८८,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**४) संगनमत करून दगडाने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ०३/०७/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी श्रीमती सुरू डोमाजी भुरे वय ६० वर्ष रा. कांद्री ही स्वतःचे शेतातील सरहद्दीतील धुऱ्यावर तुरी लावत असतांना यातील आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमत करून तुम्ही सरहद्दीतील धुऱ्यावर तुरी कशाला लावल्या असे बोलुन भांडण करून प्रथम थापडबुक्याने मारहान करून आरोपी क्र. १ याने हातात दगड उचलुन फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. सोलंखी पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**५) शेतीच्या वादावरून भांडण करून लाकडी दांडयाने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक ०२/०७/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे सख्खे भाऊ असुन त्यांची वडीलोपार्जीत जागा असुन त्याचे वडील लहान भावासोबत राहत असुन ती शेती तो करते यातील फिर्यादी लहान भावाच्या शेतीत आरोपीतांनी धान घातले त्यावरून फिर्यादीने त्यास विचारल्याने मला तिचा वाटा हवा असे बोलुन फिर्यादीचे डोक्यावर लाकडी दांडयाने डोक्यावर मारून जखमी केले व शिवीगाळ करून मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी बंडु चिरकुट पटले वय ४० वर्ष रा. सिहोरा यांचे व डॉ. रिपोर्ट पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३४२,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**६) पैश्याचे कारणा वरून लाकडी बासाच्या दांडयाने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक ०३/०७/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील आरोपीची आई हिला पैश्याच्या कारणा वरून लाकडी बासाच्या दांडयाने डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी सौ. कल्पना कार्तीक शहारे वय ४५ वर्ष रा. गिरोला हिचे बयाण व डॉ. एमएलसी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**७) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन चाकुने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक ०३/०७/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे वडीलांचे पानठेल्यावर बसला असतांना यातील आरोपी हा फिर्यादी जवळ येवुन तु व शुभम मल्लेवार माइया चुगल्या कलाबाईच्या दारुच्या अंड्डयावर का करतो व मला शिवीगाळ का करतो? असे बोलुन तोंडा —तोंडी वाद करुन आरोपीने फिर्यादीचे मानेवर चाकुने वार करुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. म्हैसकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**८) घरा समोरील खुल्या जागेतील बैल चोरी : —**

दिनांक ०४/०७/२०१८ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादी नितेश शामराव हटवार वय २५ वर्ष, रा. अडयाळ यांचा बैल घरासमोरील खुल्या जागेमध्ये टिना खाली बांधलेल्या बैलापैकी एक पांढऱ्या रंगाचा बैल किंमती २५,०००/—रु. आरोपी यांने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी नितेश शामराव हटवार वय २५ वर्ष, रा. अडयाळ यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**९) तांब्याचा ताराची चोरी : —**

दिनांक ०४/०७/२०१८ चे ११.०० वाजताा दरम्यान यातील फिर्यादी विजयकुमार लिल्हारे वय ३४ वर्ष, रा. देव्हाडी तुमसर रोड हा गस्तकरिता स्टॉफ सह गेले असता दवडीपार गावाजवळ तांब्याचा तार ५० मिटर वजन ४० किलो किंमती १०,०००/—रु. चा कोणीतरी अज्ञात आरोपीने माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१०) अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे ईरादयाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक ०४/०७/२०१८ चे ०३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी हा रात्रीचे वेळी अंधारात स्वतःचे अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे ईरादयाने संशयास्पद स्थितीत मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. माहुर्ले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १२२(क) मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**११) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु : –**

दिंनाक २९/०६/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील मृतक नरेश रुषीदेव डोंगरे वय ४० वर्ष, रा. गुंथारा याची प्रकृती खराब झाल्याने औषधोपचारा करिता पर्स हॉस्पीटल भंडारा येथे भरती केले असता दिंनाक २९/०६/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान उपचारा दरम्यान अज्ञात आजाराने मरण पावल्याने पोस्टे भंडारा मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपालाव्दारे पोस्टे ला आज रोजी प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सुनिल राजकुमार ठाकरे वय २३ वर्ष, पर्स हॉस्पीटल भंडारा वार्ड बॉय यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**१२) अवैध देशी दारू /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ०४/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन पवनी व भंडारा येथे अवैध देशी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २४३० लिटर हातभट्टी देशी दारू किंमती १३,०२,०००/–रु. व जुगारातुन किंमती ५१५/–रु. असा एकुण किंमती १३,०२,५१५/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०४/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १११ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ११, तीन सिटर वाहनाकरीता– ०५ ईतर वाहनांवरती – ९५ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आह

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.